
Welcome



**Subject :- Economy ( अर्थशास्त्र )**

By

Dr. Pandit Mule


Dept. of Economy

Kalikadevi College, Shirur (ka.)Dist.Beed

## सरासरी स्थिर खर्च (Average Variable Cost)

$$\text{सरासरी स्थिर खर्च} = \frac{\text{एकूण स्थिर खर्च}}{\text{एकूण उत्पादन}}$$


ह्या खर्चाचा विचार करता हे स्पष्ट होते की, उत्पादनाच्या वाढीबरोबर हा ख घटत जातो. याचाच अर्थ जेवढे उत्पादन अधिक होईल तेवढा सरासरी स्थिर खर्च कमी कमी उत्पादन असताना हा परिव्यय अधिक असतो. उदा. मागील तक्त्यात उत्पादन ए नगाचे असताना हा खर्च रु. 20 आहे, तर उत्पादन 4 नगाचे असताना तो रु. 5 होतो उत्पादन 10 नगाचे असताना तर तो रु 2 एवढा असतो. वरील खर्चाचे स्पष्टीकरण रकाना 5 मध्ये केले आहे.


Y
M
20
A
10
B
सरासरी स्थिर खर्च वक्र
6
C
N
स्थिर खर्च
0
1
2
3
4
X
उत्पादन

वरील आकृतीत OX अक्षावर उत्पादन पातळी व OY अक्षावर सरासरी स्थिर खर्च मोजला आहे. उत्पादन एका नगाचे असताना हा खर्च रु. 20 असतो हे 'A' बिंदूनी दाखविले आहे. अशाप्रकारे भिन्न उत्पादन पातळीला असलेला सरासरी स्थिर खर्च दर्शविणारे B, C हे बिंदू काढले आहेत व हे सर्व MN ह्या रेषेनी जोडले असता जो वक्र मिळतो त्यास सरासरी स्थिर खर्च वक्र म्हणतात. जो ऋण आकाराचा असतो.

$$\text{सरासरी बदलता खर्च} = \frac{\text{एकूण बदलता खर्च}}{\text{एकूण उत्पादन}}$$

उत्पादनात सरासरी बदलता परिव्यय अत्यंत महत्त्वाचा असतो. कारण हा खर्च उत्पादनाच्या भिन्न पातळीला भिन्न असतो. एवढेच नाही तर उत्पादनात जसजशी वाढ होत जाते तसतसा हा खर्च एका मर्यादेपर्यंत सातत्याने घटत जातो व त्यानंतर तो सतत वाढत जातो. उदा. मागील तक्त्यातील रकाना नं. 6 मधील खर्चाचा विचार केला असता हे स्पष्ट होते की, उत्पादन पहिल्या नगापासून चार नगापर्यंत वाढत असताना हा खर्च अनुक्रमे रु. 30, 28, 25, 20 ह्या प्रमाणे घटत गेला आहे व त्यानंतरही उत्पादनात जेव्हा वाढ होत गेली तेव्हा हा खर्च रु. 21, 22, 26, 40 ह्याप्रमाणे वाढत गेलेला लक्षात येतो.




(आकृतीक्रमांक३.१३)

आकृतीत OX अक्षावर उत्पादन व OY अक्षावर सरासरी बदलता खर्च मोजला आहे. भिन्न उत्पादन पातळीला असलेला सरासरी बदलता परिव्यय दर्शविणारे A, B, C, D, E, F हे भिन्न बिंदू काढले आहेत. हे सर्व बिंदू एकाच वक्राच्या साह्याने जोडले असता MN हा सरासरी बदलता खर्च वक्र मिळतो. हा वक्र M पासून D पर्यंत सातत्याने घटत जातो व D पासून N पर्यंत वाढत जातो. अशाप्रकारे हा वक्र उत्पादनाच्या सुरुवातीच्या काळात उत्पादनाच्या विशिष्ट पातळीपर्यंत घटता किंवा ऋण (-) असतो, तर विशिष्ट पातळीनंतर तो वाढता किंवा धन (-) असतो. याचा अर्थ ह्या उत्पादन खर्चाचा वक्र इंग्रजीतील V आकाराचा असतो.

## सरासरी खर्च (परिव्यय) (Average Cost)


उत्पादनातील उत्पादकाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा खर्च म्हणजे सरासरी परिव्यय होय. कारण उत्पादकाला उत्पादनाचा निर्णय घेण्यात हा खर्च मार्गदर्शन करतो. सरासरी खर्च दोन पध्दतीने माहीत करता येतो.

सरासरी खर्च = सरासरी स्थिर खर्च + सरासरी बदलता खर्च किंवा

$$\text{सरासरी खर्च} = \frac{\text{एकूण खर्च}}{\text{एकूण उत्पादन}}$$

मागील तक्त्यातील रकाना नं. 5 + 6 = 7 हे लक्षात येईल किंवा रकाना नं. 4 ÷ 1 = 7 असेही माहीत करता येईल. वरील खर्च रकाना नं. 7 मध्ये दाखविला आहे.

ह्या परिव्ययाचा बारकाईने विचार करता याची खास वैशिष्ट्ये लक्षात येतात. (i) हा परिव्यय सरासरी स्थिर खर्च व सरासरी बदलता खर्च ह्यांच्यापेक्षा जास्त असतो. (ii) सरासरी खर्च उत्पादनाच्या सुरुवातीच्या काळात सतत घटत जातो, त्यानंतर तो स्थिर होतो व त्यानंतरही उत्पादनात वाढ झालीच तर तो उत्पादनाच्या वाढीबरोबर वाढत जातो. (iii) हा खर्च घटताना कमी गतीने (प्रमाणात) घटत जातो पण वाढताना मात्र अतिशय वेगाने वाढतो. उदा. पहिल्या नगाच्या उत्पादनाचा सरासरी खर्च रु. 50 आहे, तसाच तो चौथ्या नगापर्यंत घटत जातो. चौथ्या नगाचा खर्च रु. 25 आहे तर पाचव्या नगाचा खर्च रु. 25 आहे. याचा अर्थ हा खर्च चौथ्या आणि पाचव्या नगाला स्थिर आहे. त्यानंतर हा खर्च अनुक्रमे 25, 28, 42 ह्याप्रमाणे अतिशय वेगाने वाढतो. 10 व्या नगाचा तर खर्च रु. 302 एवढा होतो हे रकाना क्र. 7 चा अभ्यास केला असता लक्षात येते.




(आकृती क्र. ३.१४)

वरील आकृतीत OX अक्षावर उत्पादन व OY अक्षावर सरासरी खर्च मोजला आहे. पहिल्या नगाचा सरासरी खर्च रु. 50 असतो हे A बिंदूनी दाखविले आहे. तर चौथ्या, पाचव्या, सहाव्या नगाचा सरासरी खर्च दर्शविणारे C, D व E हे बिंदू काढले आहेत. अशाप्रकारे नगांचा असलेला सरासरी खर्च दर्शविणारे A, B, C, D इत्यादी बिंदू काढून हे सर्व खर्च एकाच वक्राच्या साहाय्याने जोडले अस+ता AC हा सरासरी खर्चाचा वक्र मिळतो. हा वक्र वरून खाली येणारा, त्यानंतर स्थिर होणारा व त्यानंतर वाढत जाणारा आहे हे लक्षात येते. थोडक्यात सरासरी खर्चाचा वक्र इंग्रजीतील U आकाराचा असतो. तसाच तो सरासरी स्थिर खर्च व सरासरी बदलता खर्च वक्राच्या वरच्या दिशेला असतो.


Thank you